**<u>ठळक बातम्या</u>**

- सर्वसमावेशकता हा भारताच्या आरोग्य क्षेत्रातल्या सुधारणांचा गाभा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- पाकिस्तानप्रणीत दहशतवादाच्या विरोधातली भारताची भूमिका जगभरातल्या देशांसमोर मांडण्यासाठी पहिलं शिष्टमंडळ उद्या रवाना होणार

- राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणाला महाराष्ट्र मंत्रिमंडळाची मान्यता, २०३० पर्यंत ३५ लाख घरं उभारण्याचं उद्दिष्ट

- अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर श्रीनिवासन यांचं निधन

**आणि**

- ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर कालवश

**<><><><><><>**

सरकारने आरोग्य सुविधांचं जाळं देशभरात उभं केलं असून सर्वसमावेशकता हा भारताच्या आरोग्य क्षेत्रातल्या सुधारणांचा गाभा आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. स्वित्झर्लंड मधल्या जिनिव्हा इथं आयोजित जागतिक आरोग्य सभेला ते दूरदृश्यप्रणालीद्वारे संबोधित करत होते. ५८ कोटी लोकांना आरोग्य विमा पुरवणारी आयुष्मान भारत ही जगातली सर्वात मोठी आरोग्य योजना केंद्र सरकार राबवतं असं प्रधानमंत्री म्हणाले. ग्लोबल साऊथ देशांसमोर आरोग्याचे अनेक प्रश्न आहेत, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. भारतात हजारो आरोग्य केंद्र उभारण्यात आली असून यामुळे कर्करोग, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यासारख्या रोगांचं निदान लवकर होणं शक्य झालं आहे, औषध विक्री केंद्रातून उच्च दर्जाची

औषधं कमी किमतीत उपलब्ध आहेत, तंत्रज्ञानामुळे आरोग्य सुविधांमधे सुधारणा झाली आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

पाकिस्तानप्रणीत दहशतवादाच्या विरोधातली भारताची भूमिका जगभरातल्या देशांसमोर मांडण्यासाठी पाठवण्यात येणाऱ्या शिष्टमंडळांपैकी पहिलं शिष्टमंडळ उद्या दौऱ्यावर निघणार आहे. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे मंडळ संयुक्त अरब अमिरात, लायबेरिया, कॉंगो आणि सिएरा लेओन इथे जाणार आहे. जदयू चे खासदार संजय झा आणि द्रमुक च्या खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालची शिष्टमंडळं गुरुवारी निघणार आहेत. या शिष्टमंडळांच्या सदस्यांना आज नवी दिल्लीत संसद भवनात परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी आवश्यक माहिती दिली.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

बुलढाणा शहरातही आज तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यातल्या खामगाव इथं कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वात तिरंगा यात्रा काढण्यात आली.

तिरंगा यात्रेबद्दल मुंबईतल्या नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ऐकू या…

**होल्ड…. बाईट**

**<><><><><>**

“माझं घर - माझे अधिकार” हे ब्रीदवाक्य असलेल्या, "राज्य गृहनिर्माण धोरण २०२५" ला राज्य मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या गृहनिर्माण धोरणात ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी, औद्योगिक कामगार, पत्रकार, दिव्यांग, माजी सैनिक या

सर्वांच्या घरांचा विचार केला असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. राज्य शासनानं २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी ३५ लाख घरं उभारण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून, सर्वसामान्यांच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक घटकासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत. निवासी वापरासाठी योग्य असलेल्या शासकीय जमिनींची एक बँक निर्माण केली जाईल, असं ते म्हणाले. हे धोरण ग्रीन बिल्डिंग पद्धतींना प्रोत्साहन देणारं आहे. पर्यावरणपूरक पायाभूत सुविधांच्या एकत्रीकरणाला प्रोत्साहन देत शहरांचं अधिक हरितीकरण करण्यावर भर दिला आहे, असं शिंदे यांनी सांगितलं.

उद्योग विभागातल्या, धोरण कालावधी संपल्यामुळे प्रलंबित असलेल्या ३२५ प्रस्तावांनाही मंत्रिमंडळानं या बैठकीत मंजुरी दिली. यामुळे सुमारे १ लाख ६५६ कोटी रूपयांची गुंतवणूक, आणि ९३ हजार ३१७ रोजगार निर्मिती होणं अपेक्षित आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पदाची शपथ दिली. मुंबईत राजभवन इथं झालेल्या या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मन की बात या कार्यक्रमाद्वारे येत्या रविवारी जनतेशी संवाद साधणार आहेत.

श्रोते या कार्यक्रमासाठी त्यांच्या सूचना १ ८ ० ० १ १ ७ ८ ० ० या टोल फ्री क्रमांकावर पाठवू शकतात. नरेंद्र मोदी ॲप आणि माय गव्ह ॲपद्वारेही आपल्या सूचना २३ मे पर्यंत पाठवता येतील.

**<><><><><>**

प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर एम आर श्रीनिवासन यांचं आज तामिळनाडूमधे निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. डॉक्टर श्रीनिवासन यांना भारताच्या नागरी अणुऊर्जा कार्यक्रमाचे शिल्पकार म्हणून ओळखलं जातं. अणुऊर्जा विभागात सप्टेंबर १९५५ ला त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. भारताची पहिली अणुभट्टी अप्सरा च्या निर्मितीत डॉक्टर होमी भाभा यांच्यासोबत श्रीनिवासन यांचा सहभाग होता. देशातल्या महत्त्वाच्या ऊर्जा प्रकल्पांच्या निर्मितीत त्यांचं मोठं योगदान होतं. श्रीनिवासन यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी श्रीनिवासन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><><>**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ आणि विज्ञान साहित्यिक जयंत नारळीकर यांचं आज पहाटे पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. फ्रेड हॉयल यांच्यासह त्यांनी मांडलेला हॉयल-नारळीकर सिद्धांत प्रसिद्ध आहे. भारत सरकारनं त्यांना पद्मभूषण तसंच पद्मविभूषण या पुरस्कारांनी गौरवलं होतं. पुण्यात आयुका या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा प्रमुख सहभाग होता. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्यासाठी ‘पोस्टकार्डाद्वारे विज्ञान’ सारख्या अभिनव कल्पना त्यांनी राबवल्या. विज्ञानकथांबरोबरच त्यांनी विज्ञानावर विपुल लिखाण केलं. त्यांच्या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी नारळीकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><><>**

वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या वतीने आयोजित दोन दिवसीय स्टार्टअप कॉन्क्लेव्हला आजपासून मुंबईत सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते परिषदेचं उद्घाटन झालं. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. या परिषदेत ८०० पेक्षा जास्त प्रतिनिधी, वैज्ञानिक, ७० पेक्षा जास्त स्टार्टअप्स, औद्योगिक भागीदार, गुंतवणूकदार, शैक्षणिक संस्था आणि सरकारी यंत्रणांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. स्टार्टअप्स, गुंतवणूकदार आणि शासकीय प्रतिनिधींमधे संवाद घडवून आणण्याच्या उद्देशाने या परिषदेत विशेष संवाद आणि चर्चासत्रं आयोजित केली आहेत.

**<><><><><><>**

अनेक हिंसक कारवायांमधे सहभागी असलेल्या पाच महिला नक्षलवाद्यांना पोलीस आणि केंद्रीय राखीव दलाच्या जवानांनी आज गडचिरोली इथून ताब्यात घेतलं. त्यांच्यावर एकूण ३६ लाख रुपयांचं इनाम होतं. उंगी मंगरू होयाम उर्फ सुमली, पल्लवी केसा मिडियम उर्फ बंडी आणि देवे कोसा पोडियाम उर्फ सविता अशी अटक केलेल्या नक्षलवाद्यांची नावं आहेत. दोन अल्पवयीन आहेत. त्यांच्याकडून तीन एसएलआर रायफल, एक ३०३ रायफल, दोन भरमार बंदुका जप्त करण्यात आल्या आहेत.

**<><><><><><>**

कल्याणमध्ये एका रहिवासी इमारतीचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका लहान मुलासह सहा जणांचा मृत्यू झाला, तर पाच जणांना वाचवण्यात यश आलं. दुपारी तीनच्या सुमाराला या इमारतीच्या चौथ्या मजल्याचा स्लॅब कोसळून ही दुर्घटना झाल्याची माहिती कल्याणचे उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांनी दिली. यात ढिगाऱ्याखाली अडकलेल्या एकंदर ११ जणांपैकी पाच जणांना अग्निशमन दलानं बाहेर काढलं, तर सहा जण दगावल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

न्यायिक सेवेतल्या प्रवेश स्तरावरच्या पदांसाठी अर्ज करण्याकरता किमान तीन वर्ष ॲडव्होकेट म्हणून काम करणं अनिवार्य करणारी अट सर्वोच्च न्यायालयानं आज पुन्हा लागू केली. मात्र, यापूर्वी सुरू झालेल्या नोकरीभरतीची प्रक्रियांना ही अट लागू होणार नसून यापुढच्या भरतीसाठीच विचारात घेतली जाईल, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

**<><><><><><>**

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदाच मुंबईत आलेले असताना त्यांच्या स्वागतासाठी राज्याच्या मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, तसंच मुंबईचे पोलीस आयुक्त गैरहजर राहिल्याबद्दल महाराष्ट्र आणि गोवा बार काउन्सिलनं एकमतानं त्यांचा निषेध केला आहे. त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी करणारं पत्र बार कौन्सिलनं मुख्यमंत्र्यांना तसंच मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना लिहिलं आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्लीत चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या ८ षटकात ५ बाद ७८ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><><>//**